दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक १५७ | MAHMAR/2006/17212 | रायगड | रविवार, दि.२४ ऑगस्ट २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## शेतकऱ्यांनी संकटाची सवय लावून घ्यावी : पाशा पटेल

### शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मराठवाड्यासह राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. भाजप नेते आणि राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी वादग्रस्त वक्तव्य केले आहे. शेतकऱ्यांना संकटाची सवय लावून घ्यावी आणि निसर्गाच्या ऱ्हासाची कर्मफळे भोगावी लागतील, असे वक्तव्य पाशा पटेल यांनी केलं आहे. या विधानामुळे शेतकरी वर्गात तीव्र नाराजी पसरली असून, शेतकरी संघटना आणि विरोधी पक्षांनी त्यावर जोरदार टीका केली आहे. शेतकऱ्यांचे लाखो एकर पिकांचे नुकसान झाले असून, ते पंचनामे आणि सरकारी मदतीच्या प्रतीक्षेत आहेत.



# मतदार याद्यांमध्ये मोठा घोळ, बारीक लक्ष द्या : राज ठाकरे

**दै.रायगड नगरी । पुणे**

एकीकडे राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर मतचोरीचा आरोप केल्यानंतर त्याचं मुद्द्यावरून आता मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आक्रमक भूमिका घेतल्याचं दिसतंय. मतदारयाद्यांमध्ये मोठा घोळ झाला आहे, त्याकडे सर्वांनी लक्ष द्या असा कानमंत्र राज ठाकरेंनी पदाधिकाऱ्यांना दिल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पुण्यामध्ये मनसेच्या पदाधिकाऱ्यांची त्यांनी बैठक घेतली.

मनसेच्या पदाधिकाऱ्यांना राज ठाकरेंनी काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. सर्वांनी आपल्या प्रभागांमध्ये जाऊन मतदारयाद्यांबाबत जनजागृती करा, अशा सूचना त्यांनी दिल्याचं समजतंय. दरम्यान मतचोरीच्या आरोपांची चौकशी झाली पाहिजे, चौकशी झाली तर १०-१२ वर्षांचा खेळ उघडा पडेल, असं वक्तव्यही राज ठाकरेंनी बैठकीत केलं आहे.

राहुल गांधी यांनी मत चोरी संदर्भात जो आवाज उठवला आहे त्याबाबत सर्वांनी आपल्या प्रभागात लक्ष देऊन मतदार यादींबाबत जनजागृती करावे असं राज ठाकरेंनी पदाधिकाऱ्यांना सांगितलं. मतदारसंघामध्ये जाऊन प्रत्येकाने काम करावं, ४० माणसांमागे दोन ब्लॉक लेव्हल ऑफिसर नेमावेत असा सल्लाही राज ठाकरेंनी दिल्याची माहिती आहे. याबाबत कुणी कुचराई केली तर त्या प्रभागात मी निवडणूक लढवणार नाही असा इशाराही राज ठाकरेंनी दिला. मतदार याद्यांच्या घोळावर आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर काँग्रेससह सर्वच विरोधी पक्षांच्या नेत्यांनी आवाज उठवला आहे. त्यावर निवडणूक आयोगानेही स्पष्टीकरण दिलं आहे.



# रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलची सेंटर ऑफ एक्सलन्सला भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सातारा येथील सेंटर ऑफ एक्सलन्स या आधुनिक केंद्रास संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या मान्यवर सदस्यांनी भेट दिली.

या प्रसंगी प्रमुख मान्यवर म्हणून संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, व्हाईस चेअरमन ॲड. भगिरथकाका शिंदे, संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील, संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सन्मानीय सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे सचिव विकास देशमुख, उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव प्रा. डॉ. शिवलिंग मेनकुदळे, माध्यमिक विभागाचे सहसचिव बंडू पवार, सहसचिव (ऑडिट) डॉ. राजेंद्र मोरे, प्राचार्य डॉ. ए. सी. अत्तार, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर, तसेच सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार यांनी संस्थेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) अभ्यासक्रम के.जी. ते पी.जी. पर्यंत सुरू करण्याच्या महत्वाच्या सूचना दिल्या होत्या. त्या सूचनेनुसार आज प्राथमिक शाळा ते पदव्युत्तर शिक्षणामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता अभ्यासक्रम यशस्वीपणे सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमासाठी सर्व शैक्षणिक गटांसाठी एआय विषयक पुस्तके तयार करून त्याचे पेटंट देखील मिळविण्यात आले आहे व व्यवस्थितरीत्या सर्व शाळा आणि महाविद्यालयांत एआय कोर्सेस चालू करण्यात आले आहेत, याचा फायदा विद्यार्थ्यांना भविष्यासाठी होणार असल्याचे सांगत याचा आनंद असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता पुढील वाटचालीसाठी आधुनिक एआय सेंटर ऑफ एक्सलन्स कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा येथे उभारण्यात आले असून या केंद्राचा लाभ केवळ रयत शिक्षण संस्थेतीलच नव्हे तर इतर संस्थांच्या विद्यार्थ्यांनाही होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## आयुष्मान कार्डसाठी ३१ ऑगस्ट अंतिम मुदत

**दै.रायगड नगरी । रायगड**

जिल्ह्यातील नागरिकांना 'एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' (एबी-पीएमजेएवाय) 'महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना' (एमजेपीजेएवाय) यांचा लाभमिळावा, यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. या अंतर्गत ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत नागरिकांना 'आयुष्मान भारत गोल्डन कार्ड' तयार करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना प्रतिवर्ष पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळणार असून, यामध्ये १ हजार ३५६ प्रकारच्या शस्त्रक्रिया व विशेष उपचारांचा समावेश आहे. तसेच कुटुंबातील ७० वर्षांवरील सदस्यांना 'आयुष्मान भारत वय वंदना कार्ड'च्या माध्यमातून अतिरिक्त पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळणार आहेत. आरोग्य योजनांचा लाभ घेण्यासाठी कुटुंबातील प्रत्येक सदस्याकडे आयुष्मान भारत गोल्ड कार्ड असणे बंधनकारक आहे.

याशिवाय आशा स्वयंसेविका, आपले सरकार सेवा केंद्र, तसेच स्वस्त धान्य दुकानदार (रेशन दुकानदार) यांच्या माध्यमातूनही कार्ड तयार करता येईल. 'आयुष्मान भारत गोल्ड कार्ड सरकारी तसेच खासगी रुग्णालयांमध्ये लाभार्थी उपचार घेऊ शकतात. जास्तीत जास्त नागरिकांनी या विशेष मोहिमेत सहभाग नोंदवून स्वतःचे व आपल्या कुटुंबीयांचे कार्ड त्वरित काढून घ्यावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.




शासनाने हे कार्ड बनविण्याची प्रक्रिया आता सुलभ केली असून, नागरिकांना गुगल प्ले स्टोअरवरील 'आयुष्मान ॲप' डाउनलोड करून किंवा https://beneficiary.nha.gov.in या संकेतस्थळावर भेट देऊन स्वतःच 'आयुष्मान भारत गोल्ड कार्ड' तयार करता येईल.

# महापालिका कार्यक्षेत्रातील रस्ते दुरुस्तीला वेग

### वेगाने कामे करण्याच्या आयुक्तांच्या सूचना

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या तीन महिन्यांत झालेल्या मुसळधार पावसामुळे पनवेल महापालिका क्षेत्रातील अनेक रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. यामुळे नागरिकांना प्रवास करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. येऊ घातलेल्या सणांच्या तोंडावर महापालिकेतर्फे आता रस्ते दुरुस्तीच्या कामांना मोठ्या प्रमाणात सुरूवात करण्यात आली आहे. नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी बांधकाम विभागाला वेगाने कामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

ऑगस्ट महिन्यात पावसाचा जोर कमी होईल अशी अपेक्षा असतानाही दुसऱ्या व तिसऱ्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे रस्ता दुरुस्तीची कामे काही दिवस थांबली होती. मात्र महापालिका आयुक्तांनी बांधकाम विभागाला तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्यानंतर शहरातील प्रमुख रस्त्यांवर खड्डे बुजविणे व डांबरीकरणास सुरूवात झाली आहे. दरम्यान अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे व शहर अभियंता संजय कटेकर यांनी पालिका क्षेत्रातील रस्त्याची पाहणी केली असून नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी वेगाने कामे करण्याच्या सूचना कनिष्ठ अभियंत्यांना दिल्या आहेत.

रस्ते दुरुस्तीची कामे जलद गतीने करण्याच्यादृष्टीने बांधकाम विभागाच्यावतीने महापालिका क्षेत्रातील प्रभागवार कनिष्ठ अभियंत्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

रस्ते दुरुस्तीच्या कामांमुळे काही ठिकाणी वाहतूक कोंडीची शक्यता असून, नागरिकांनी या काळात संयम व सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.



### मुंबई-कुशीनगर एक्स्प्रेसमध्ये खळबळ

# एसी कोचच्या शौचालयातील कचराकुंडीत मुलीची बॉडी सापडली

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई-कुशीनगर एक्स्प्रेसच्या एसी कोचच्या बाथरुममधील कचराकुंडीत ५ वर्षीय मुलीचा मृतदेह सापडला आहे. ट्रेनमध्ये याबद्दलची माहिती वाऱ्यासारखी पसरली आणि प्रवाशांना एकच धक्का बसला. रेल्वेच्या अधिकाऱ्यांना याबद्दल कळवण्यात आलं. अधिकाऱ्यांनी घटनास्थळ गाठून तपासणी केली. ट्रेनच्या शौचालयातून मुलीचा मृतदेह ताब्यात घेण्यात आला आणि तो शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. या प्रकरणाचा तपास केला जात आहे.



मुलीचा मृतदेह एलटीटी कुशी नगर एक्स्प्रेसच्या (गाडी क्रमांक २२५३७) एसी कोच बी२ च्या शौचालयातील कचरापेटीत मुलीचा मृतदेह आढळून आला आहे. तिचं वय ५ वर्षांच्या आसपास आहे. ट्रेनच्या एसी कोच बी२ च्या शौचालयात कचरापेटी होती. त्यात मुलीचा मृतदेह आढळून आला. तो पाहून प्रवाशांना धक्काच बसला. याची माहिती रेल्वे पोलीस आणि प्रशासनाला देण्यात आली. मध्य रात्री एकच्या सुमारास कुशीनगर एक्स्प्रेस लोकमान्य टिळक टर्मिनसवर असताना शौचालयातील कचराकुंडीत मुलीचा मृतदेह सापडला. याची माहिती रात्री पावणे दोनच्या सुमारास प्रशासनाला देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच रेल्वेचे अधिकारी आणि पोलीस पोहोचले. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. घटनास्थळाची तपासणी केली. याबद्दल ट्रेनमधील अन्य प्रवाशांचा समजताच एकच खळबळ उडाली. पोलिसांनी ट्रेनच्या शौचालयातून मृतदेह बाहेर काढला आणि तो शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. मुलीला अपहरण करुन आणण्यात आलं होतं, अशी माहिती प्राथमिक तपासातून समोर आली आहे.

मुलीचं अपहरण तिच्याच नातेवाईकानं केलं होतं. पोलिसांनी घटनेचं गांभीर्य ओळखून तपास सुरु केला आहे. प्राथमिक तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार, मुलीच्या मावस भावाचा अपहरणात सहभाग होता. पोलिसांनी घटनास्थळी असलेल्या संबंधितांचे जबाब नोंदवले आहेत. अपहरण आणि हत्या या दोन्ही अंगांनी तपास केला जात आहे.

# माणगावात बेकायदेशीर खाणीचा थैमान ; तहसिलदारांचा आदेश धाब्यावर

**दै.रायगड नगरी । महाड**

माणगाव तालुक्यातील कोस्ते बु. गावात बेकायदेशीर खाणकाम आणि क्रशर उद्योगाचा अक्षरशः थैमान सुरू आहे. शासनाचे आदेश, तहसिलदारांचे निर्देश, आणि कायद्याची भीती - हे सर्व शब्द केवळ कागदावर उरले असून प्रत्यक्षात बेकायदेशीर कामांचा उद्योग जोरात सुरू आहे. शेतकरी राजाराम रणपिसे आणि इतर सहखातेदारांच्या मालकीच्या जमिनींमध्ये जबरदस्ती घुसखोरी करून जमिनीचे स्वरूप पूर्णपणे बदलले गेले आहे. तब्बल ३० फूट खोलवर खणून जमीन उद्ध्वस्त करण्यात आली आहे. या बेकायदेशीर कामामुळे शेतजमिनीची नैसर्गिक रचना उद्ध्वस्त झाली, शेतकऱ्यांचे हक्क पायदळी तुडवले गेले, आणि तब्बल ५० लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.



सदर जमिनींबाबत अर्जदाराकडे कायदेशीर अखत्यारपत्र असून जमिनीच्या मालकीबाबत कोणताही वाद नाही. तरीदेखील काही जणांनी जमिनीत बेकायदेशीररीत्या रस्ता तयार करण्याचा प्रयत्न केला, खोदकाम सुरू केले, आणि त्यावर क्रशर उभारून दगडफोड सुरू केली. ग्रामस्थांनी तक्रार केल्यानंतर तहसिलदार माणगाव यांनी प्रत्यक्ष पाहणी करून सदर क्रशरला सील लावले. परंतु दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, तहसिलदारांचा आदेश उघडपणे झुगारून देत सील लावलेल्या क्रशरवर पुन्हा अवैधरित्या काम सुरू करण्यात आले. म्हणजेच शासनाचा आदेश आणि प्रशासनाची प्रतिष्ठा धुळीस मिळवून, कायद्याला सरळ सरळ हरताळ फासण्यात आला आहे.

या बेकायदेशीर कृत्यामुळे शेतकऱ्यांचे केवळ आर्थिक नुकसान झालेले नाही, तर त्यांच्या आयुष्याचा पाया हादरला आहे. शेतजमीन ही शेतकऱ्याची आई असते; त्या आईवरच गुन्हेगारांनी घाव घातला आहे. शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनीवर अतिक्रमण करून खोदकाम करणे, सील तोडून क्रशर सुरू करणे, खोटी कागदपत्रे तयार करून फसवणूक करणे आणि शासन अधिकाऱ्यांच्या आदेशाला झुगारणे - हे सर्व प्रकार थेट फौजदारी गुन्ह्याच्या स्वरूपाचे आहेत.

आज प्रश्न असा निर्माण होतो की, तहसिलदारांचा आदेश मोडून अवैधरित्या चालणाऱ्या या खाणीवर आणि क्रशरवर प्रशासन कधी कारवाई करणार? शेतकऱ्यांचा आक्रोश पोलिसांना ऐकू येत नाही का? सामान्य शेतकऱ्यांची जमीन उद्ध्वस्त होत असताना प्रशासनाने डोळेझाक का केली आहे? कायद्याचा आणि शासनाच्या अधिकाराचा उघड उघड अवमान करूनही आरोपींना मोकळे रान कसे मिळते आहे?

अर्जदार राजाराम रणपिसे यांनी या सर्व प्रकाराबाबत पोलिस निरीक्षक, माणगाव यांच्याकडे तक्रार दाखल केली असून संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. एवढेच नाही तर या तक्रारीची प्रत गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य, तसेच पोलीस अधीक्षक रायगड यांच्याकडे पाठविण्यात आली आहे. आता या प्रकरणात शासन व प्रशासन किती तत्परतेने कारवाई करते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

शेतकऱ्यांचा प्रश्न हा केवळ एका व्यक्तीचा नाही, तर संपूर्ण ग्रामीण भागाच्या अस्तित्वाचा आहे. जर प्रशासनाने अशा गुन्हेगारी कृत्यांकडे दुर्लक्ष केले, तर याला 'बेकायदेशीर खाणीचा माफिया' असेच म्हणावे लागेल. शासनाच्या आदेशाला हरताळ फासणाऱ्या अशा आरोपींवर कठोरात कठोर कारवाई झाली नाही, तर कायद्यावरील विश्वास उरलेला राहणार नाही.

# सर पे लाल टोपी रुसी...

परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांची रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी झालेली भेट, अमेरिकेच्या आयातशुल्काच्या मुद्द्यावर चीनने भारताची केलेली पाठराखण आणि संयुक्त राष्ट्रसंघातील अमेरिकेच्या माजी राजदूत निक्की हॅले यांनी 'भारताला दुखावू नका,' हा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना दिलेला इशारा, या एकाच दिवसातील वेगवेगळ्या घडामोडी आंतरराष्ट्रीय पटलावर भारताच्या उंचावलेल्या स्थानाचे निदर्शक आहेतच; त्याबरोबरच सध्याच्या आव्हानाच्या स्थितीत भारताला अधिक बळ मिळवून देणाऱ्याही आहेत. विशेषत: पुतिन यांनी राजशिष्टाचार बाजूला ठेवून जयशंकर यांची भेट घेण्यातूनही जगाला, विशेषत: अमेरिकेला दिलेला ठाम संदेश अधिक आश्वासक आहे. अमेरिकेच्या संभाव्य दबावाखाली आजवर न झुकलेले तिन्ही देश एकत्र येणे, ही नक्कीच महत्त्वाची घटना आहे. परराष्ट्रसंबंध ही बहुपेडी आणि दीर्घकालीन प्रक्रिया आहे. त्यामुळे या घडामोडींमधून भारत-रशिया आणि चीन यांचे नवे समीकरण जागतिक पटावर उदयास येईल, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल; मात्र बदलत्या जगातील बहुध्रुवीय व्यवस्थेची ही एक चाचपणी आहे, असे म्हणता येईल.रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर रशियाकडून तेलखरेदी केल्याबद्दल भारतावर २५ टक्के एवढे दंडात्मक आयातशुल्क (एकूण ५० टक्के) लादण्याच्या ट्रम्प यांच्या अगोचरपणाने भारत-रशिया अधिक जवळ येण्यास औचित्य मिळवून दिले असले, तरी देशाचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या काळापासून दोन्ही देश परस्परांचे दृढ सहकारी आहेत. संरक्षणासह विज्ञान-तंत्रज्ञान व अन्य विविध क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांमध्ये आज भरीव सहकार्य आहे. विशेषत: ट्रम्प यांच्या लहरीपणाच्या पार्श्वभूमीवर भारत व रशियाच्या सहकार्याच्या धोरणांमधील ठामपणा व सातत्य वेळोवेळी उठून दिसले आहे. यापूर्वी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धांमध्ये अमेरिकेने पाकिस्तानची बाजू घेतली होती, तर रशियाने भारतास ठाम पाठिंबा दिला होता. आताही ट्रम्प प्रशासन पाकिस्तानचे कोडकौतुक करून भारताला डिवचू पाहत आहे. त्या पार्श्वभूमीवर भारत व रशिया या दोन्ही देशांचे भूराजकीय धोरण हे परस्पर हितावर अवलंबून आहे. 'रशियाने भारताचे कधीच नुकसान केले नाही,' हा जयशंकर यांनी या भेटीत आवर्जून केलेला उल्लेख याचीच साक्ष देतो. भारतावर आयातशुल्क लादण्यासाठी ट्रम्प यांनी पुढे केलेले अनेक मुद्दे त्यांनी खोडून काढले. जागतिक तेल बाजारात स्थैर्य राखण्यासाठीच भारत रशियाकडून तेलखरेदी करीत आहे आणि विशेष म्हणजे अमेरिकेच्याच सल्ला-पाठिंब्याने ही तेलखरेदी सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच रशियाचा सर्वांत मोठा तेलग्राहक भारत नसून चीन आहे; तर युरोपीय संघ हा द्रवरूप इंधनाचा आघाडीचा ग्राहक आहे, हे वास्तव त्यांनी समोर आणले. एकुणात, अमेरिकेकडून कितीही दबाव आला, तरी रशियाशाशी व्यापार स्थिर आणि संतुलित पद्धतीने वाढविण्याची दिशा भारताने स्पष्ट केली आहे. येत्या पाच वर्षांत दोन्ही देशांमधील व्यापार शंभर अब्ज डॉलरपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले असून त्यासाठी आयातशुल्कही कमी करण्याबाबत झालेली चर्चा, या भारतासाठी सकारात्मक बाबी ठराव्यात. बदलत्या जगातील वास्तवाचे भान आणि संभाव्य आव्हानांची जाण असलेल्या निक्की हॅले यांनी 'भारताला दुखावू नका,' हा ट्रम्प यांना दिलेला इशारा म्हणून महत्त्वाचा आहे. दुसरीकडे अमेरिकेने भारतावर लादलेल्या आयातशुल्काच्या मुद्द्यावर चीननेही भारतास पाठिंबा देऊन दुरावा कमी करण्याचे सूतोवाच केले आहे. चीनला भारताची बाजारपेठ खुणावत असल्याचे एक कारण यामागे आहेच; परंतु या निमित्ताने दोन्ही देशांतील तणाव कमी करण्याची ही एक संधीही आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महिन्याअखेरची नियोजित चीन भेट महत्त्वाची ठरणार आहे. अर्थात, चीनशी जवळीक वाढविण्याच्या मार्गात अनेक अडचणीही आहेत. विशेषत: दोन्ही देशांतील सीमाप्रश्न आणि तिबेट हे वादांचे मुद्दे आहेत. मौलाना मसूद अझरसारख्यांना आंतरराष्ट्रीय दहशतवादी म्हणून घोषित करण्यास केलेल्या विरोधासह चीनने आजवर भारताचे शत्रुराष्ट्र पाकिस्तानची वेळोवेळी पाठराखण आणि भारताची अडवणूक केली असून पाकिस्तानमधील चीनचे हितसंबंध, हासुद्धा एक अडसर ठरू शकतो.

# तळे विभाग शिक्षण मंडळाच्या बाल विकास विद्यामंदिर विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप संपन्न



**दै.रायगड नगरी । तळा**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या बालविकास मंदिर मधील विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे पाठ्यपुस्तकाचे वाटप उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी बाल विकास मंदिरचे चेअरमन पुरुषोत्तम मुळे हे होते तर व्यासपीठावर बाल विकास मंदिरच्या पालक समितीचे अध्यक्ष सौ चैताली तावडे, सदस्या सौ स्नेहल शिंदे, सौ नूतन लोखंडे, सदस्य पढवण ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच श्री विठ्ठल सुतार, तज्ञ सदस्य तळा नगरपंचायतचे माजी नगरसेवक श्री प्रकाश गायकवाड, मुख्याध्यापक सचिन भाटे यांचेसह पालक, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून गेले अनेक वर्ष बालविकास मंदिर मधील विद्यार्थ्यांना पाठय पुस्तकाचे वाटप मोफत करण्यात येत आहे. या विभागातील शिक्षक वर्ग लहान लहान मुलांची काळजी घेत शैक्षणिक उपक्रमाबरोबर इतर बौद्धिक उपक्रम घेऊन मुलांचा सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करीत आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुंदर आहे. आपण पालकांनी आपल्या पाल्याचा या संस्थेत प्रवेश घेतला त्याबद्दल आपली संस्था आभारी आहे. शाळेच्या प्रगतीमध्ये आपले सहकार्य महत्त्वाचे आहे. गुरुजन परिश्रम घेत आहेतच पण आपले मौलिक मार्गदर्शन-सहकार्य लाभले तर यशाची वाटचाल सोपी होईल. संस्था आपले पाठीशी ठामपणे उभी आहे. आपल्या काही समस्या असतील तर त्या मुख्याध्यापक श्री सचिन भाटे, पालक समिती यांचे निदर्शनास आणून द्या. शाळा समस्या सोडवण्यासाठी नक्की प्रयत्न करेल. संस्थेने दिलेल्या पाठ्यपुस्तकांचा आपल्या पाल्यांकडून उत्तम उपयोग करून घ्यावा. असे विचार चेअरमन पुरुषोत्तम मुळे व सदस्य प्रकाश गायकवाड यांनी व्यक्त करताना ओळख कार्ड साठी पालक सौ दर्शना ज्ञानेश्वर भोईर-चोरगे यांनी आर्थिक सहकार्य केल्याबद्दल चेअरमन पुरुषोत्तम मुळे यांनी त्यांचे खास आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री सचिन भाटे सरांनी उत्तम प्रकारे मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# श्रीवर्धन बाजारपेठेत चायनीज हॉटेल वाल्यांची किचन रस्त्यावर

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

आत्ताच्या नवीन पिढीमध्ये चायनीज खाण्याचे वेड तरुणाईला लागलेले पाहायला मिळते. अनेक तरुण-तरुणी चायनीज हॉटेल मधून जेवण पार्सल नेतात किंवा त्या ठिकाणी चायनीज राईस, नूडल्स व विविध मिळणारे पदार्थ खाताना दिसून येतात मात्र. श्रीवर्धन बाजारपेठेत असलेल्या सर्वच चायनीज वाल्यांनी आपली किचन रस्त्यावर ठेवल्यामुळे त्या ठिकाणहून जाणाऱ्या पादचार्यांना मसाल्याचा ठसका लागण्याचा त्रास होतो. अनेक जणांचे डोळे देखील चुरचुरतात. नगर परिषदेच्या नियमानुसार हॉटेलमध्ये किचन हे आतल्या बाजूलाच असावे लागते.

परंतु हे सर्व नियम धाब्यावरती बसवून चायनीज रेस्टॉरंट वाले खुलेआम पणे पुढच्या भागात किचन चालवत असलेले दिसून येतात. चायनीज खाणे शरीरास घातक असले तरी चटपट्या चवीमुळे अनेक जण चायनीज खाण्यासाठी जात असतात. सदर चायनीज पदार्थ बनवत असताना त्यामध्ये वापरली जाणारी सॉस अत्यंत निकृष्ट दर्जाची असतात. तरी श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाने अशा प्रकारे बाहेर किचन ठेवणाऱ्यांवरती कडक कारवाई करावी व हॉटेलच्या पुढील भागात किचन ठेवण्यास मनाई करावी. अशी मागणी शहरातील नागरिकांमधून होत आहे.



# माथेरानमध्ये गणेश उत्सवानिमित्त विविध पूजा साहित्याचे वाटप

**दै.रायगड नगरी । माथेरान**

भाद्रपद महिन्याला सुरुवात होताच गणपती आगमनाच्या तयारीला अधिक जोर येत असतो माथेरानमध्ये ही पावसाळी पर्यटन हंगाम नुकताच संपला असल्याने येथील नागरिकांना आता वेध लागले आहे ते गणरायाच्या आगमनाचे त्याचप्रमाणे येथील सामाजिक कार्यकर्ते आता गणरायाच्या सेवेसाठीही पुढे आले असून त्यांच्यामार्फत येथील घरगुती गणेशोत्सव साजरा करणाऱ्यांकरिता विविध पूजा साहित्य व इतर वस्तूंचे वाटप सुरू करण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने माथेरान शहर भाजपा पक्षातर्फे पूजेसाठी लागणारे सर्व साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे तर प्रसादासाठी लागणाऱ्या सुकामेव्याचे वाटप शिवसेनेचे शहराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या मार्फत करण्यात येणार आहे त्याचप्रमाणे पूजेसाठी लागणारे श्रीफळ हे प्रमोद नायक व नरेश परदेशी यांच्याकडून देण्यात येणार आहे त्याचप्रमाणे माथेरान शहर व हाशाची पट्टी या आदिवासी वाडीला माजी नगरसेवक शिवाजी शिंदे व व्यावसायिक भास्कर शिंदे यांच्याकडून प्रत्येकी दहा किलो साखर असे वाटप करण्यात येणार आहे. यावेळी कोणताही गाजावाजा न करता हे पूजेचे साहित्य वाटप करण्यात येणार असल्याने निश्चितच त्याचा लाभ माथेरान मधील गणेश भक्तांना होणार आहे.

# मोकाट कुत्र्यांनी केला चिमुरड्यावर हल्ला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर, सेक्टर-३४ मधील ट्युलिप सोसायटी मधील १० वर्षीय मुलावर मोकाट कुत्र्याने हल्ला कल्याची घटना घडल्याने पालक वर्गामध्ये भीतीयुक्त वातावरण आहे. दरम्यान, पनवेल महापालिकेने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी रहिवाशांकडून केली जात आहे.

खारघर, सेक्टर-३४ मधील ट्युलिप सोसायटी मधील १० वर्षीय मुलगा दुपारी शाळेतून घरी येत असताना रस्त्याच्या कडेला उभे असलेल्या ५ कुत्र्यांनी त्या मुलाला घेरले. चारही बाजुने कुत्र्यांनी घेरल्यामुळे घाबरलेला सदर मुलगा मदतीसाठी जोराने ओरडत होता, घाबरलेला मुलगा खाली पडला होता. यावेळी शेजारील कृष्णा रेसिडेन्सी मधील रहिवाशाने या मुलाचा आवाज ऐकून बाहेर पहिले असता, त्याला ५ कुत्र्यांनी चारही बाजुने घेरले असल्याचे निदर्शनास येताच त्यांनी धाव घेत त्या बालकाला कुत्र्यांच्या घोळक्यातून सोडविले. खाली पडल्यामुळे बालकांच्या घुडगा आणि पायाला दुखापत झाली आहे. सुदैवाने कुत्र्याने त्याला चावा घेतला नाही. शेजारी मदतीसाठी धावून आला नसता तर त्या कुत्र्यांनी मुलांचे लचके तोडले असते.

सदरची घटना सोशल मीडियावर पसरल्यामुळे शालेय विद्यार्थी आणि पालकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. याबाबत रहिवाशांकडून मिळालेल्या माहितीनुसार खारघर, सेक्टर-३० ते ३५ या परिसरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला आहे. रस्त्यावर घोळका मांडून बसलेले कुत्रे रस्त्यावरुन जाणाऱ्या दुचाकी वाहन चालकांचा पाठलाग करीत असल्यामुळे किरकोळ अपघाताच्या घटनाही घडल्या आहेत. एकंदरीतच खारघर परिसरात मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे शाळकरी मुले, वृध्द, महिला-पुरुष रस्त्यांवर निर्भयपणे वावरु शकत नाहीत. मोकाट कुत्र्यांचा विषय महापालिकेने गांभीयनि घ्यावा आणि त्यांच्या बंदोबस्तासाठी पावले उचलावीत, अशी मागणी खारघरवासियांकडून केली जात आहे.

या संदर्भात महापालिकेच्या श्वान विभागाचे अधिकारी डॉ. बी. एन. गीते यांच्याशी संपर्क केला असता, महापालिकेकडून मोकाट कुत्र्यांना पकडून त्यांची नसबंदी आणि लसीकरण केले जात आहे. खारघर, सेक्टर-३४ परिसरातील मोकाट कुत्र्यांची नसबंदी आणि लसीकरण केले जाईल, असे त्यांनी सांगितले.

जानेवारी ते जून या ६ महिन्यात ४२६ जणांना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतला आहे. खारघरमध्ये दिवसाला २ ते ३ जणांना कुत्र्यांनी चावा घेतल्याचे दिसून येते. जून महिन्यात स्पॅगेटी सोसायटी येथे मोकाट कुत्र्याने सुरक्षा रक्षकावर हल्ला करुन त्याचा जबडा फाडल्याची घटना घडली होती, सेक्टर-१० मध्ये सकाळी मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या सायकलस्वाराचा कुत्र्याने चावा घेतला होता.

# जेएसडब्ल्यू कंपनीच्या फेज ३ ची जनसुनावणी यशस्वी



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील वडखळ- डोलवी परिसरात असणाऱ्या जेएसडब्ल्यू कंपनीच्या फेज ३ च्या विस्तारीकरणासाठी दि. २२ रोजी जेएसडब्ल्यू जेटी वाहनतळ, धरमतर पोलीस चौकी जवळ जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले होते.ही जनसुनावणी यशस्वीरित्या पार पडून कंपनीच्या या विस्तारीकरणाला हजारों नागरीकांडून हिरवा कंदील देण्यात आला आहे. सदर जनसुनावणी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ऋतुजा भालेराव, पेण प्रांताधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ यांच्या उपस्थितीत घेण्यात आली.

दुपारच्या दरम्यान सुरू झालेल्या कंपनीच्या जनसुनावणीत कंपनीच्या अधिकारी वर्गातील ज्योतींद्र देशमुख व विवेक कुलकर्णी यांनी कंपनीच्या विस्तारीकरणासह प्रदूषणासंदर्भात कंपनीने आजतागायत केलेल्या पेण, नागोठणे, अलिबाग या भागातील विकासकामांबाबत तसेच येणाऱ्या नियोजनाबाबत कंपनीच्या वतीने जनसुनावणी दरम्यान उपस्थित जनतेसमोर अहवाल मांडला व होत असलेल्या विस्तारीकरणात सदर कंपनी येथील भागांमध्ये अधिकाधिक विकास करण्याच्या दृष्टिकोनातून काम करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.त्यानंतर सुनावणीसाठी आलेल्या लोकांकडून मत मांडण्यात सुरुवात झाली

त्यावेळी या परिसरातील उपस्थित आजी, माजी सरपंच उपसरपंच, स्थानिक राजकीय लोकप्रतिनिधी यांनी येणाऱ्या प्रकल्पाचे स्वागत करून प्रकल्प वाढला तरच येथील रोजगार वाढणार आहे. आजपर्यंत कंपनीने या भागासाठी चांगल्या सुविधा दिल्या असून या जनसुनावणीला जाहीर पाठिंबा असल्याचे दर्शविले आहे.तर

यावेळी सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन, नंदा म्हात्रे, कुंदा गावंड, संतोष ठाकूर, चैतन्य पाटील यांच्यासह काही नागरिकांनी आपल्या हरकती नोंदविल्या असता यावेळी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते परंतु यावेळी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी उपस्थितांचे म्हणणे ऐकून ज्यांना हरकती नोंदवायच्या आहेत त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग येथे सोमवार मंगळवारी लेखी स्वरूपात मान्य मांडावे असे आव्हान करून जनसुनावणी यशस्वीरित्या पार पाडली. या जनसुनावणी दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घड नये याकरिता पेण डीवायएसपी जालिंदर नालकुल यांच्या मार्गदर्शनाखाली पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे, दादर सागरी पोलीस निरीक्षक संजीवकुमार ब्राह्मणे यांच्याकडून मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# नगराध्यक्ष पदाचे आरक्षण जाहीर नसल्याने इच्छुक उमेदवारांकडून खर्चावर नियंत्रण

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत यावेळेस सुद्धा नगराध्यक्ष पदाची निवडणूक ही थेट जनतेच्या निर्णायक मतांच्या आधारावर होणार असल्याने ह्या महत्वपूर्ण पदासाठी इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी नगराध्यक्ष पदाचे आरक्षण जाहीर झालेले नसल्याने आपला आखडता हात घेतल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. कर्जत खालापूर मतदार संघातील कर्जत आणि खोपोली येथील नगरपरिषदेतील नगराध्यक्ष पदासाठी शिवसेनेच्या (शिंदे गटाला) जागा सोडण्यात येणार असून माथेरान नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी भाजपचा उमेदवार निश्चित करण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे माथेरान मध्ये जरी भाजपचे मताधिक्य अल्प प्रमाणात असले तरी सुद्धा वरिष्ठांच्या आदेशानुसार याठिकाणी भाजपला सहकार्य करण्यास अन्य सहकारी पक्षांच्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना भाजपच्याच उमेदवाराला निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावे लागणार असल्याची चर्चा होत आहे.

त्यामुळे इच्छुकांची एकप्रकारे कोंडी झाली असून त्यांना जर का नगराध्यक्ष पद भूषवायचे असेल तर वेळप्रसंगी भाजपचे सदस्यत्व स्वीकारावे लागणार आहे.किंवा यावेळी गप्प बसावे लागणार आहे. या महत्वपूर्ण पदाला साजेसा न्याय देणारे व्यक्तिमत्त्व शिवसेनेच्या शिंदे गटात कार्यान्वित आहेत.परंतु वरिष्ठांनी भविष्यातील मतदार संघातील राजकीय आखणी करून कर्जत आणि खोपोली याठिकाणी शिवसेना शिंदे गटाचा उमेदवार नगराध्यक्ष पदासाठी देणार असून माथेरान मध्ये यावेळी भाजपचा उमेदवार प्रथम नागरिक म्हणून सभागृहात विराजमान होण्याची शक्यता आहे. त्यातच नगरसेवक पदासाठी सुध्दा बहुतेक इच्छुक उमेदवारांनी सुध्दा काही महिन्यांपूर्वी पक्षाच्या खर्चावर निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली आहे.मागील काळात अनेक पक्षप्रवेश करण्यात आलेले आहेत. ज्या ज्या कार्यकर्त्यांचा भाजपला,उबाठा गटाला विरोध आहे त्यांनी स्वेच्छेने शिंदे गटात पक्षप्रवेश केलेले आहेत. त्यामुळे आगामी काळात जर का नगराध्यक्ष पदासाठी येथील शिवसेनेच्या कार्यक्षम नेत्यांनी भाजपचे नेतृत्व करण्यासाठी पक्षप्रवेश करून पूढाकार घेतला तर शिंदे गटात सुध्दा दोन गट पडून दुसऱ्या बाजूला भाजपची राजकीय ताकद वाढणार आहे. त्यामुळे कदाचित शिंदे गटातील अर्ध्यापेक्षा अधिक कार्यकर्ते आपल्या आवडत्या नेत्यासोबत भाजपचे सदस्यत्व स्वीकारून गावाचे हीत पाहणारा नेता भाजपचे मूळ कार्यकते आणि नव्याने भाजप मध्ये येणारे कार्यकर्ते आणि सुज्ञ मतदार नगराध्यक्ष निवडून आणू शकतात असेही राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

# गणेशोत्सवाच्या सजावटीसाठी पनवेल परिसतातील बाजारपेठ सजली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गणेशोत्सवाला अवघे काही दिवस उरले आहेत. भाविक गणरायाच्या स्वागताच्या तयारीला लागले असून सजावटीचे काम सुरू आहे. त्यामुळे सजावटीसाठी लागणाऱ्या साहित्याने बाजारपेठा सजल्या आहेत. बाजारात वेगवेगळ्या प्रकारची कृत्रिम फुले, फुलांच्या माळा, रोषणाईकरिता लागणारे दिवे, विविध प्रकारची तोरणे, आकर्षक मखरे विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

थर्माकोलचा वापर पर्यावरणासाठी घातक असल्याने त्यांच्या वापरावर काही वर्षांपूर्वी बंदी आणण्यात आली. त्यामुळे कलाकारांनी थर्माकोलच्या वस्तूंनी होणारे प्रदूषण टाळण्यासाठी थर्माकोलला पर्याय असलेल्या वस्तूंचा वापर करीत पर्यावरणपूरक मखरांची निर्मिती सुरू केली. सध्या बाजारात पर्यावरणपूरक मखरे पहायला मिळतात. ही मखरे गणेशभक्तांच्या पसंतीला पडत आहेत. साधारण दीड हजारांपासून साडेआठ हजार रुपये किमतीची मखरे सध्या बाजारात उपलब्ध आहेत. पनवेलमधील बाजारपेठा सजावटीच्या साहित्याने सजल्या आहेत. रंगीत कागद, विद्युत रोषणाईच्या माळा, कृत्रिम फुलांचे हार, फुलदाणी अशा वस्तू विक्रीसाठी आल्या आहेत. एलईडी बल्बच्या माळांना भरपूर मागणी आहे. याशिवाय फळे, फुले व पानांची सुंदर तोरणेही बाजारात उपलब्ध असून ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हलगर्जीपणामुळे माथेरान घाटात तीन वाहनांचा विचित्र अपघात



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान घाटातील जुमापट्टी येथे आज सकाळी झालेल्या विचित्र अपघाताने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणाचा पुन्हा एकदा पर्दाफाश केला आहे. एस-टर्न या अवघड वळणावर एकाच वेळी तीन वाहने एकमेकांवर आदळली असून अपघातात जीवितहानी टळली असली तरी वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.

मान्सून सुरू झाल्यानंतर माथेरान घाटातील गटारे साफ करण्यात आले नाहीत.त्यामुळे गटारातील पाणी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर वाहत असल्याने रस्त्यावरील डांबर निघून जाऊन रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्ड्यांच्या स्वरूपात चरी पडल्याचे चित्र होते.त्याच बरोबर वाहून गेलेल्या पाण्यामुळे खड्ड्यांतील खडी रस्त्यावर पसरली आणि रस्ता निसरडा झाला. परिणामी, घाट उतरत असलेले वाहन चालक ब्रेक मारताना नियंत्रण गमावून बसत असून आजवर घाटात अनेक वाहनांचे यामुळे अपघात घडले आहेत.मोटरसायकल चालक तर कित्येक वेळा स्लिप होऊन अपघातग्रस्त झालेले आहेत.त्यातच आज मुंबई, ठाणे जिल्ह्यातील आलेले पर्यटक हे सकाळी घाट उतरत असताना खडीवरील पर्यटकांचे वाहन स्लिप होऊन समोरून चढत असलेल्या ईरटीका कारवर धडकले. त्याचवेळी मागोमाग येणारी आणखी एक कारही नियंत्रण सुटल्याने अपघातग्रस्त वाहनावर आदळली. सुदैवाने मोठा अनर्थ टळला.अन्यथा घाटातील ही दुर्लक्षाची साखळी आज गंभीर दुर्घटनेत बदलली असती असे येथील नागरिक सांगत आहेत.

दरम्यान आज या अपघातामुळे घाटातील सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आज जीवितहानी झाली नाही, पण प्रशासन मृत्यूची वाट पाहते का? असा संतप्त सवाल नागरिक आणि पर्यटकांमधून उपस्थित केला जात आहे. अपघातानंतर काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. पर्यटकांनी आणि स्थानिक नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची जोरदार मागणी केली आहे. घाटातील खड्डे बुजविणे, गटारे साफ करणे यांसारखी प्राथमिक कामेही वेळेत होत नाहीत. अशा निष्काळजी अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केला पाहिजे, अशी मागणी पुढे येत आहे.

दरवर्षी पावसाळ्यात माथेरान घाटातील खड्ड्यांचा आणि गटारांच्या दुर्लक्षाचा बळी पर्यटक व वाहनचालक ठरतात. प्रशासनाने तात्काळ उपाययोजना केल्या नाहीत, तर कोणत्याही क्षणी मोठा जीवितहानीकारक अपघात घडू शकतो.

# व्हेल माशाच्या उलटी तस्करीप्रकरणी महाड-पोलादपूर येथील आरोपींची धरपकड

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पुणे जिल्ह्यातील भांबुर्डा वनपरिक्षेत्रालगतच्या वाहनांच्या झडतीमध्ये कोटयवधी रूपये आंतरराष्ट्रीय बाजारात किंमत असलेली व्हेल माशाची उलटी हस्तगत करण्यात आली. यावेळी चार तरूणांपैकी एक मास्टरमाईंड तरूण पळून जाण्यात यशस्वी झाला असला तरी महाड तालुक्यातील दोन व पोलादपूर शहरातील एका तरूणावर झडप घालण्यात वनपरिक्षेत्राच्या अधिकाऱ्यांना यश आले असून शुक्रवारी आरोपींची धरपकड करण्यात आल्याची अधिकृत माहिती संबंधित अधिकृत सूत्रांनी दिली.

महाड व पोलादपूर तालुक्यातील तरूणांना व्हेल माशाची उलटी म्हणजे अम्बरग्रीस या तरंगणारे सोने म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पदार्थाची तस्करी करण्याची संधी मिळाली. त्यानुसार त्यांनी पुणे परिसरात व्हेल माशाची उलटीची विक्री करण्यासाठी एक इनोव्हा कार घेऊन पुर्णपणे योजना आखली. मात्र, वनविभागाला गुप्त सुत्रांमार्फत माहिती मिळाली असल्याने नेमके भांबुर्डा वनपरिक्षेत्रालगत गुरूवारी रात्री तरूणांचे वाहन आढळून आल्यानंतर तरूण टप्प्यात आल्याने वनविभागाने त्यांचा परफेक्ट कार्यक्रम केला.



या छाप्यावेळी एका रोहित शंकर पवार (रा.धामणी,ता.महाड) या तरूणाने चतुराईने स्वत:ला सोडवून पळून जाण्यात यश मिळविले. उर्वरित तरूणांनी आपली ओळख व नांवे लपवून वनविभागाच्या अधिकाऱ्यांना बुचकळयात टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना फारकाळ त्यांची भूमिका टिकवून धरता न आल्याने त्यांची खरी नांवे आणि पत्ता समजणे सोपे गेले. शुक्रवारी सकाळी पुणे न्यायालयामध्ये यापैकी महाड शहरालगत सुंदरवाडी येथील जय धारिया आणि पोलादपूर शहरातील रामजानकी अपार्टमेंटमधून स्वप्निल बबन मोरे (मूळगांव वडाचा कोंड,पोलादपूर)या दोन तरूणांना ताब्यात घेऊन पुणे येथे न्यायालयामध्ये शनिवारी हजर करण्यासाठी नेले. या प्रकरणाची माहिती महाड आणि पोलादपूर शहरामध्ये कोणासही समजणार नाही, याबाबत पुणे भांबुर्डा वनपरिक्षेत्राकडून दक्षता घेण्यात आली असूनही वनविभागाच्या तपासकार्यामुळे काही नागरिकांना या प्रकरणाचा सुगावा लागला आहे. पोलादपूर शहरातून हस्तगत करण्यात आलेल्या तरूणाला अनेक स्थानिकांनी खिशाला महाराष्ट्र शासनाचे ओळखपत्र लटकवून वावरत असल्याचे पाहिल्याची माहिती प्राप्त झाली.

यासंदर्भात अधिक माहिती मिळविता वनपरिक्षेत्राच्या सुत्रांनी मास्टरमाईंड असलेल्या रोहित शंकर पवार याच्या सांगण्यावरून काही तरूण या व्यवसायात झटपट पैसा मिळवून श्रीमंत होण्यासाठी सहभागी झाले. यापैकी काही तरूण चेहऱ्यावर अतिशय साधेपणा घेऊन वावरत असले तरी त्यांचे पुणे येथे अतिशय उच्चभ्रू श्रीमंतांच्या वस्तीमध्ये वास्तव्य असल्याचे तपासादरम्यान समजून आले, अशी माहिती देताना रोहित पवारला ताब्यात घेतल्यानंतर या व्हेल माशाची उलटी प्रकरणात आणखी किती तरूणांचे रॅकेट अस्तित्वात आहे, याबाबत माहिती उघड होणार असून शनिवारी महाड व पोलादपूर येथून धरपकड करण्यात आलेल्या दोन आरोपींसह छाप्यावेळी पकडलेल्या आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आले असून पुढील तपासादरम्यान आणखी काही तरूण महाड व पोलादपूर तालुक्यांमधून हस्तगत करण्यात येण्याची वर्तविण्यात येत आहे. पुणे भांबुर्डा वनपरिक्षेत्रातील वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी आतापर्यंत व्हेल माशाची उलटी तस्करीची अनेक प्रकरणे मुद्देमालासह उघडकीस आणली असून पुणे भांबुर्डा येथील आरएफओ बारबोले यांनी गुरूवारच्या कारवाईचे नेतृत्व करून तपास कार्य केले असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

# जिल्हाधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

जिल्हा उद्योग केंद्र रायगड अलिबाग आणि पनवेल इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह इस्टेट लिमिटेड पनवेल यांच्या विद्यमाने २३ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते पनवेलमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. त्यावेळी वड, सोनचाफा, कडुलिंब इत्यादी झाडे लावण्यात आली.

रायगडचे जिल्हाधिकारी २३ ऑगस्ट रोजी पनवेल मध्ये कार्यक्रमानिमित्त आले होते. त्यांनी पनवेल इंडस्ट्रियल ईस्टेट आणि जिल्हा उद्योग केंद्र रायगड अलिबाग यांच्या वतीने राबवण्यात आलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात वृक्षारोपण केले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पनवेलचे प्रांत अधिकारी पवन चांडक, पनवेलचे तहसीलदार विजय पाटील, पनवेल इंडस्ट्रियल इस्टेटचे अध्यक्ष विजय लोखंडे, उपाध्यक्षा सुवर्णा पुराणिक, कल्पना लोखंडे, दिप लोखंडे, इंडस्ट्रीयलचे मॅनेजर दत्ताकुमार सावंत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# उरणमध्ये गणेशोत्सव व ईद सणांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची दंगा काबू तालीम

**दै.रायगड नगरी । उरण**

उरणमध्ये गणेशोत्सव व ईद - ए- मिलाद सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले असून,या सणांच्या अनुषंगाने उरण,मोरा सागरी आणि न्हावाशेवा या सहाय्यक पोलिस आयुक्त शेवा बंदर नवीमुंबई यांच्या आधिपत्त्याखाली कार्यान्वित असलेल्या तीन पोलिस ठाण्याच्या संयुक्त विद्यमाने दंगा काबू तालीम घेण्यात आली. काल २३ ऑगस्ट रोजी सकाळी ११:०० ते ११:४५ वाजताचे दरम्यान उरण एसटी बस डेपो,चारफाटा येथे घेण्यात आलेल्या दंगा काबू योजनेच्या रंगीत तालीमेत ४ सहाय्यक पोलिस निरीक्षक,२ पोलिस उपनिरीक्षकांसह पोलिस अधिकारी व ५३ पोलिस अंमलदारांसह द्रोणागिरी सिडको अग्निशमन विभागाकडील १ अधिकारी व ५ कर्मचारी यांच्यासह इंदिरा गांधी ग्रामिण रुग्णालयाच्या २ रुग्णवाहिके सोबत २ कर्मचारी उपस्थित होते.

## शुद्धीपत्रक

या शुद्धीपत्रकाद्वारे असे जाहीर करण्यात येते की, दै.रायगड नगरी या वृत्तपत्रात दि.२३ ऑगस्ट रोजी २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या नोटीसीमध्ये सदनिका क्र.बी-२०५, प्लॉट क्र. सी-२, ज्ञानसारथी को-ऑप. हौ. सोसायटी लिमिटेड, सेक्टर १२, खारघर, ता. पनवेल जि. रायगड या पत्त्यावर क्षेत्रफळ-६२.१२ चौरस मिटर बिल्टअप ५१.७७ चौरस मिटर कारपेट व टेरेस ४.२८ चौरस मिटर, नोंदणी कृत दस्त क्रमांक उरण (पनवेल-२)/६५८/२००५ दि.१९/१/२००७ प्रमाणे श्रीमती अमिता मुक्तीदास बाराहाते यांचे नावे प्राप्त व स्थित आहे., असे प्रसिद्ध झाले होते.

त्याऐवजी सदनिका क्र.बी-५०५, प्लॉट क्र. सी-२, ज्ञानसारथी को-ऑप. हौ. सोसायटी लिमिटेड, सेक्टर १२, खारघर, ता. पनवेल जि. रायगड या पत्त्यावर क्षेत्रफळ-६२.१२ चौरस मिटर बिल्टअप ५१.७७ चौरस मिटर कारपेट व टेरेस ४.२८ चौरस मिटर, नोंदणी कृत दस्त क्रमांक उरण (पनवेल-२)/६५८/२००५ दि.१९/१/२००७ प्रमाणे श्रीमती अमिता मुक्तीदास बाराहाते यांचे नावे प्राप्त व स्थित आहे., असे वाचण्यात यावे, असे या शुद्धीपत्रकाद्वारे जाहीर करण्यात येत आहे.

दि.२४/०८/२०२५

सही/-
**ॲड.जे. बी. शिकलगार**
**(खरेदीदाराचे वकील)**
**गाळा क्र.२, प्लॉट क्र.सी-२, ज्ञानसारथी सह गृह संस्था मर्या सेक्टर-१२, खारघर, नवी मुंबई.**
**संपर्क क्र. ९३२३८६७६१४**

# मुरुडच्या अंजुमन इस्लाम जंजिरा महाविद्यालयात जागतिक डास दिनानिमित्त जनजागृती

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुडच्या अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरूड येथील प्राणिशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक डास दिन' निमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली डासांमुळे उद्भवणाऱ्या आजारांवर जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या विशेष उपक्रमात मुरुड शहरातील नगरपरिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना डासांपासून होणाऱ्या आजारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया, फिलेरिया अशा डासांमुळे होणाऱ्या आजारांची माहिती देऊन स्वच्छता व प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे महत्त्व पटवून सांगण्यात आले. या उपक्रमामध्ये अंजुमन विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सादरीकरण, माहितीपत्रक वितरण व प्रत्यक्ष संवादातून विद्यार्थ्यांना जागरूक केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राणिशास्त्र विभागप्रमुख प्रा. जावेद खान, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. फिरोज शेख, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागप्रमुख प्रा. रहीम बागवान तसेच विद्यार्थ्यांमध्ये जारा खानजादा, जुवेरिया कलबस्कर, फातिमा जमरुतखाणी आणि आमीना किल्लेदार उपस्थित होते.


## वाचकांसाठी विनम्र सूचना

'दै.रायगड नगरी' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'दै.रायगड नगरी' वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.



## गाळा विकणे आहे

**नवीन कोर्टा समोर दुकानी (शॉप) ६५० स्के फुट गाळा विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा.**

**9892181313**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, १) श्रीमती महादी आंबो म्हात्रे उर्फ रखमाबाई आंबो म्हात्रे २) श्रीमती बेबी भिकाजी डूकरे ३) श्रीमती लडकी पदू पवार उर्फ सरस्वती पदू पवार ४) श्रीमती रंजना विलास भगत ५) श्रीमती फशी अमर पटेल उर्फ पुष्पा अमर पटेल ६) श्री. नारायण पुंडलीक पाटील ७) श्रीमती विठाबाई देहू पाटील उर्फ आनंदीबाई देहू पाटील ८) श्रीमती शंकुतला चंद्रकांत गावडे उर्फ अंजनी चंद्रकांत गावडे ९) श्री. नरेश बाळाराम म्हात्रे १०) श्रीमती रीना महेश म्हात्रे ११) श्री. किशोर बाळाराम म्हात्रे यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची मौजे मौजे कोन, तालुका पनवेल, जिल्हा रायगड सर्व्हे नं. ३९/९/ब, एकूण क्षेत्रफळ एकूण ०.२१.०० (हे. आ. पॉ.) ही जमीन मिळकत माझ्या अशिलांनी दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजीच्या समजोता कराराद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीवर किंवा सदर मिळकतीच्या कोणत्याही भागावर कोणाचेही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेपट्टा, साठेखत, अखत्यारपत्र, विकसन करार, समजोता करार किंवा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी किंवा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क हितसंबंधांचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर जमिन मिळकत निर्वेध, व बोजा रहित असून त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही तक्रारी, दावे, हरकती रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिलेल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक : २३/०८/२०२५

सही/-
**ॲड.किशोर कान्हा पाटील**
**ऑफिस क्रमांक १०९, पहिला मजला, नगरपालिका शॉपींग कॉम्प्लेक्स, श्री दत्त झेरॉक्स जवळ, ओल्ड पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.**
**संपर्क ९६१९११२१५५.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत कालिदास शिवमूर्ती भांडेकर यांच्या मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहेत. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील मौजे पिरकोन, येथील मिळकत भूमापन नं. ८५/१ यांसी क्षेत्र ०.२३.५० हे. आर. प्र., पोटखराबा ०.०२.३० हे. आर. प्र. यांसी आकार रक्कम रुपये ०.८१ पैसे, यांसी चतु:सीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीख: २४ ऑगस्ट २०२५

सही/-
**श्री.विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारा तर्फे वकिल, ३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३.**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२.**

## ग्रामपंचायत कोल्हारे

ता.कर्जत, जि.रायगड

### जाहीर सूचना

ग्रामपंचायत कोल्हारे, ता.कर्जत, जि.रायगड हे ग्रामपंचायत कोल्हारे हद्दीतील ग्रामनिधी व पाणी पुरवठा योजनेंतर्गत खालील विकास कामे करण्याकरिता सिलबंद निविदा मागवित आहेत.

| अ क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | निधी स्त्रोत |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत कोल्हारे हद्दीतील मौजे धामोते येथील स्टुडिओ हायफाय फेज-२ बिल्डींग ते सागर प्लाझा बिल्डींग रस्ता माती भराव व खडीकरण करणे. | ४५००००/- | ४५००/- | ग्रामनिधी |
| २ | ग्रामपंचायत हद्दीतील मौजे धामोते येथील नेरळ कळंब मुख्य रस्ता ते शुभारंभ गार्डन पर्यंत स्ट्रीट लाईट लावणे. | २७००००/- | २७००/- | ग्रामनिधी |
| ३ | ग्रामपंचायत कोल्हारे हद्दीतील मौजे धामोते येथील नेरळ-कळंब मुख्य रस्ता ते साई आवास बिल्डींग पर्यंत स्ट्रीट लाईट लावणे. | ३९००००/- | ३९००/- | ग्रामनिधी |
| ४ | ग्रामपंचायत कोल्हारे हद्दीतील मौजे बोपेले बिल्डींग ते बोपेले गावापर्यंत स्ट्रीट लाईट पोल बसविणे. | ३३००००/- | ३३००/- | ग्रामनिधी |
| ५ | ग्रामपंचायत कोल्हारे हद्दीतील मौजे बोपेले येथील एक्सपायर बिल्डींग ते अनिका अपार्टमेंट बिल्डींग पर्यंत रस्ता खडीकरण करणे. | २५०००/- | २५०/- | ग्रामनिधी |
| ६ | ग्रामपंचायत कोल्हारे हद्दीतील मौजे धामोते येथील स्वागत व्हीलेज बिल्डींग ते सुर्या गॅलेक्सी बिल्डींग पर्यंत रस्ता खडीकरण करणे. | २५०००/- | २५०/- | ग्रामनिधी |
| ७ | ग्रामपचांयत कोल्हारे हद्दीतील मौजे धामोते येथील साई मंदिर ते लक्ष्मी अर्चिट बिल्डींग पर्यंत रस्ता खडीकरण करणे. | २५०००/- | २५०/- | ग्रामनिधी |
| ८ | ग्रामपंचायत कोल्हारे हद्दीतील मौजे कोल्हारे चारफाटा येथील अंतर्गत रस्ता व पाईप मोरी गटार तयार करणे. | ५०००००/- | ५०००/- | ग्रामनिधी |
| ९ | ग्रामपंचायत कोल्हारे हद्दीतील मौजे धामोते येथील पाण्याच्या जॅकवेल येथे २०० केव्हीएचा ट्रान्सफार्मर बसविणे. | ७४९९४५/- | ७४९९/- | पाणी पुरवठा |

**अटी व शर्ती**

१) निविदा मिळणेकरिता दि.२५/०८/२०२५ ते ०३/०९/२०२५ पर्यंत लेखी अर्ज सादर करणे.
२) अर्जदारांना सदर कोरे निविदा प्रपत्र दि.२५/०८/२०२५ ते ०३/०९/२०२५ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यालयात दुपारी ०३:०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
३) भरलेल्या सिलबंद निविदा दि.०४/०९/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी ११:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
४) आलेल्या निविदा दि.०४/०९/२०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता समक्ष उघडण्यात येतील.
५) इसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत कोल्हारे यांचे नावे असावा, अथवा रोखीने.
६) मंजूर ठेकेदारास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
७) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल व अंदाजपत्रक मिळणे कामी विनंती अर्ज केल्यावर व १०० रु. भरणा केल्यानंतर मिळेल.
८) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
९) निविदा किंमत ना परतावा राहील.
१०) नियमाप्रमाणे आयकर भरावा लागेल.
११) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
१२) कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २% जीएसटी, २% आयकर, १% कर्मचारी विमा, रकमा प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
१३) निविदा मंजूर केल्यावर रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा.
१४) सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे काम करण्याचे आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कोल्हारे**
**ता.कर्जत, जि.रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कोल्हारे**
**ता.कर्जत, जि.रायगड**

# महेंद्रशेठ घरत यांनी दुसऱ्यांदा पूर्ण केली कैलास मानसरोवर यात्रा




**दै.रायगड नगरी । उरण**

महेंद्रशेठ घरत यांनी यंदा दुसऱ्यांदा कैलास मानसरोवर यात्रा पूर्ण केली. १० ऑगस्ट २०२५ रोजी यात्रा सुरु झाली. अतिशय खडतर असणारी कैलास मानसरोवर यात्रा गुरुवारी (ता. २१) त्यांनी पूर्ण केली. हिंदू धर्मात अतिशय पवित्र समजली जाणारी ही यात्रा आहे. ही यात्रा पूर्ण करणाऱ्याला 'कैलाशी' असे संबोधले जाते. ही यात्रा अंतिम यात्रा म्हणून समजली जाते. त्यामुळे यापूर्वी त्यांनी २०१८ मध्ये सपत्निक ही यात्रा पूर्ण केली होती. मात्र 'डोकलाम' मुद्यावरून २०१८ पासून कैलास मानसरोवर यात्रा बंद होती, परंतु यंदा जूनमध्ये कैलास मानसरोवर यात्रेला परवानगी मिळाल्यानंतर तातडीने ही संधी महेंद्रशेठ घरत यांनी दुसऱ्यांदा साधली.

कैलास मानसरोवर यात्रेत तीन दिवसांच्या अतिशय खडतर अशा कैलाश परिक्रमेचा समावेश होता. दारचिन येथून पहाटे पाच वाजता परिक्रमेला सुरुवात केली आणि यमद्वाराला तीन फेऱ्या मारून कैलाश मानसरोवर परिक्रमेला प्रारंभ केला. त्यानंतर सुंदर नद्या, उंचच उंच बर्फाळ पर्वत, ऊन-पावसाचा खेळ सोसत पहिल्या दिवसाचा १४ किमीचा प्रवास त्यांनी बर्फातून झाला. दक्षिण भागाचे हे दर्शन विलोभनीय होते. देरापूक उत्तरमुखाचे सुंदर दर्शन घेतल्यावर प्रवासाचा ताण कमी झाल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

गौरीकुंडाचे विहंगम दृश्य डोळ्यांचे पारणे फेडते. नंदीच्या आकाराचे ते पर्वत पाहून स्वर्गसुखाचा अनुभव आला. त्यानंतर दुसरा दिवस २२ किमी खडतर पर्वत आणि बर्फातून त्यांनी प्रवास केला. त्यानंतर धुतूरपूरला मुक्काम करून तिसऱ्या दिवसाची पहाट उजाडली. तेव्हा त्यांनी ६ किमी आणि १८ हजार फुटांपेक्षा जास्त असा बर्फातून प्रवास सुखरूप केला. या प्रवासात अनेकांना उलट्या होणे, चक्कर येणे,ऑक्सिजन लेवल कमी असल्यामुळे सर्वांना गुदमरल्यासारखे होणे हे सर्रास होत होते. तेव्हा आपल्याला आपली पात्रता काय आहे हे कळते आणि अहंकार गळून पडतो, असे महेंद्रशेठ घरत म्हणतात.

या साऱ्या प्रवासात अतिशय अवघड ट्रेक असल्याने जगभरातून पर्यटक येत असतात. प्रव-ासात जागोजागी श्वास घेतानाही त्रास होतो, हाडे गोठवणाऱ्या थंडीचा अनुभव घेतल्यानंतरच खऱ्या अर्थाने कैलास मानसरोवर यात्रा काय आहे, हे त्यांनाही कळते. त्यामुळे पुनर्जन्माचा अनुभव घेऊनच 'कैलासी' घरचा रस्ता धरतात. साधारण ५२ किमीचा कैलास मानसरोवरचा हा महाकठीण प्रवास पर्यटकांना दुसऱ्या जन्माचा अनुभव देतो. दार्चेन ते देरापूक या ट्रेकिंगमध्ये कैलास पर्वताच्या उत्तरेकडील भागाचे नयनरम्य दृश्य दिसते जे यात्रेकरूंसाठी एक पवित्र आणि अविस्मरणीय ठरते.

कैलास परिक्रमेचा सर्वोच्च बिंदू असलेला डोल्मा पास ओलांडताना तर मेंदूला झिणझिण्या येतात. तरीही ट्रेकचा सर्वात कठीण, परंतु आध्यात्मिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा प्रवास करताना महेंद्रशेठ घरत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी धीर सोडला नाही. दरम्यान, महारुद्र अभिषेक, जागोजागी आरती करून ते शिवशंकराचरणी लीन झाले होते. गौरी कुंड आणि एक पवित्र तलाव ओलांडून त्यांनी झुथुलपुक येथे प्रवेश केला. झुथुलपुक ते दार्चेन, सागा येथे गाडीने गेले. त्यानंतर दार्चेनला पुन्हा ट्रेकिंग करण्यात आली. त्यामुळे कैलास परिक्रमा पूर्ण केल्याची भावना, तिबेटी लँडस्केप ओलांडून परत येताना सर्व पर्यटकांना कायम राहिली. याक हा केसाळ प्राणी, मेंढ्या, जंगली गाढव, हजारो जीव-जंतू, पक्षी,चिमण्या या सुद्धा अतिशय थंड वातावरणात राहतात हे 'याचि देही याचि डोळा' कैलास मानसरोवर यात्रेनिमित्त पाहता आले, असे महेंद्रशेठ घरत म्हणतात.

'अष्टपद' हे जैन धर्मीयांचे अतिशय महत्त्व-पूर्ण तीर्थस्थान आहे. ते कैलास पर्वताच्या जवळ आहे. जैन धर्मात अष्टपद हे भगवान ऋषभदेवाच्या (आदिनाथ) मोक्षाचे (मुक्ती) स्थान मानले जाते. त्यामुळे जैन धर्मीय बांधव ही महत्त्वपूर्ण यात्रा करण्यासाठी कैलास मानसरोवरला आवर्जून जातात कारण त्यामुळेच अष्टपदाचे दर्शन होते. महेंद्रशेठ घरत यांनीही हे दर्शन घेतले आणि आपण कैलासी आहोत हे दाखवून दिले. त्यामुळेच राजकीय आणि सामाजिक जीवनात सक्रिय असलेल्यांमध्ये कैलास मानसरोवर ही महाकठीण यात्रा दुसऱ्यांदा पूर्ण करणारे महेंद्रशेठ घरत हे एकमेवद्वितीय असल्याचे मानले जात आहे. त्यांची गणना सध्या 'पर्यटनाचा बादशहा' म्हणून होत आहे.

दुसऱ्यांदा कैलास मानसरोवर यात्रा पूर्ण केल्याने मनस्वी आनंद झाला आहे. २०१८ मध्ये कैलास मानसरोवर यात्रेसाठी सौभाग्यवती सोबत होती तो अनुभव विलक्षण होता. कैलास मानसरोवर यात्रा आपल्याला योग्यता दाखवतो. आपण कुठून आलो, कोठे जाणार, आपण सर्व पशू-पक्षी, जनावरे ही एकाच ईश्वराची लेकरे आहोत.

त्यामुळे व्यर्थ अभिमान कशाला? त्यामुळेच यंदा सहकाऱ्यांसोबत शिवशंकराचे आभार मानण्यासाठी दुसऱ्यांदा कैलास मानसरोवर यात्रा पूर्ण केली त्यामुळे स्वतःला धन्य झाल्याचे समजतो, अशा भावना आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी कैलास मानसरोवर यात्रा दुसऱ्यांदा पूर्ण केल्यानंतर व्यक्त केल्या.

# श्रीवर्धन शहरात वाहतूक कोंडीची समस्या जटील



**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन शहरामध्ये वाहतूक कोंडी नित्याचीच झाली आहे. वाहतूक कोंडीमुळे पाच मिनिटाच्या प्रवासासाठी नागरिकांना २० ते २५ मिनिटे वाया घालवावी लागतात. श्रीवर्धन शहरातील वाणी आळी परिसरात बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ इंडिया, युनियन बँक, अण्णा साहेब सावंत को.ऑपरेटिव्ह अर्बन बँक इत्यादी बँकेच्या शाखा आहेत. त्यासह विविध फायनान्स कंपन्यांच्या देखील शाखा आहेत. त्यामुळे या परिसरामध्ये बँकेत कामानिमित्त जाणारे नागरिक रस्त्याच्या दुतर्फा वेड्यावाकड्या दुचाकी उभ्या करत असल्यामुळे नेहमीच वाहतूक कोंडी होत असते.

शहरातील टिळक मार्ग परिसरात देखील हीच परिस्थिती आहे. तर श्रीवर्धन बाजारपेठेत अक्षरशः दुचाकींचे वाहन तळ आहे की काय? अशी शंका निर्माण होते. कारण संपूर्ण बाजारपेठेत रस्त्याच्या दोन्ही बाजूला कशाही वेड्यावाकड्या दुचाकी उभ्या केलेल्या असतात. त्यातच या ठिकाणी असलेल्या व्यापाऱ्यांकडे माल खाली करण्यासाठी ट्रक किंवा टेम्पो आल्यानंतर वाहतुकीच्या कोंडीत मोठ्या प्रमाणावर भर पडते. मच्छी मार्केट, भाजी मार्केट या परिसरामध्ये नेहमीच बेशिस्त पणे वेड्यावाकड्या दुचाकी उभ्या केलेल्या पाहायला मिळतात. श्रीवर्धन शहरात काही अधिकृत रिक्षा स्टॅन्ड वगळता अन्य ठिकाणी रिक्षाचालकांनी आपल्या रिक्षा उभ्या करून रिक्षा स्टॅन्ड तयार केले आहेत.

पेशवे आळी ते बाजारपेठ या कोपरी मार्ग या ठिकाणी रोज आपला बाजार या दुकानासमोर दहा ते बारा रिक्षा रांगेत उभे असतात. त्यामुळे या परिसरात देखील मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागतो. श्रीवर्धन भाजी मार्केट समोर असलेल्या एका मिठाईच्या व्यापाऱ्याने तर आपल्या दुकानासमोर मोठा लाकडी फलाट आणून ठेवला आहे. सदरचा रस्ता नगरपालिकेचा असून अशा प्रकारे फलाट टाकून जागा अडविण्याचा प्रकार आहे. तरी संबंधित व्यापारावर नगरपरिषदेने कारवाई करावी अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे. संपूर्ण श्रीवर्धन शहरामध्ये वाहतुकीचे नियमन करण्यासाठी केवळ एकच वाहतूक पोलीस तैनात असतो. हा पोलीस देखील श्रीवर्धनच्या प्रवेशद्वारावर असलेल्या कमानीजवळ कायम उभा असलेला पाहायला मिळतो.

वाणी आळी, बाजारपेठ, टिळक मार्ग या परिसरात कितीही वाहतूक कोंडी झाली. तरी कोणीही पोलीस त्या ठिकाणी वाहतूक कोंडी मोकळी करण्यासाठी उपलब्ध नसतात.आता गौरी गणपतीच्या सणासुदीला अनेक चाकरमानी गावाकडे येणार आहेत. त्यामुळे बाजारपेठेत गर्दी उसळणार आहे. तरी रायगडच्या जिल्हा वाहतूक शाखेने श्रीवर्धन शहरात अजून एका वाहतूक पोलिसाची नियुक्ती करण्याची आवश्यकता आहे. वाहतूक कोंडीत भर होण्याचे दुसरे कारण भाजी मार्केटमध्ये अनेक भाजी व्यापारी रस्त्यावरती प्लास्टिकचे क्रेट ठेवून त्यावरती भाजी विकायला ठेवत असल्यामुळे रस्त्याची दोन दोन फूट जागा व्यापली जाते. तरी श्रीवर्धन नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांनी अशा रस्ता अडवणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# जिल्ह्याचा जीडीपी २०२७-२८ पर्यंत तीन लाख कोटींवर नेण्याचा संकल्प : जिल्हाधिकारी



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

सध्या जिल्ह्याचा जीडीपी एक लाख पाच हजार कोटी इतका आहे. २०२७-२८ पर्यंत तो १ लाख ८६ हजार कोटी होणार आहे.

परंतु लघु उद्योग भारती आणि जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त प्रयत्नांमुळे तो २०२७-२८ पर्यंत ३ लाख कोटींवर नेण्याचा विश्वास जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी व्यक्त केला. 'उद्योग सुसंवाद २०२५' कार्यक्रमाचे आयोजन वासुदेव बळवंत फडके सभागृह, पनवेल येथे करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, पनवेल महानगरपालिका उपायुक्त वैभव विधाते, जयेश देढीया, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळया तसेच विविध एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष व लघुउद्योजक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले की,उद्योग विभागाशी निगडित अनेक प्रश्न प्रलंबित आहेत त्यावर तोडगा काढण्यासाठी सर्व विभागांना सोबत घेऊन, चर्चा करून प्रशासन मार्ग काढत आहे. जिल्हा प्रशासन 'उद्योग सेतू' या उपक्रमाच्या माध्यमातून उद्योजकांचे अडी अडचणी आणि प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत आहे.

लघु उद्योग भारती हा लघुउद्योजक आणि शासन यामधील दुवा म्हणून काम करत असून ऊर्जेच्या प्रश्नावर त्यांनी यशस्वी मध्यस्थी केली आहे. तसेच इन्कम टॅक्स कलम ४३ एच मध्ये सुधारणा करण्यासाठीही त्यांचा मोलाचा वाटा आहे.

रायगड जिल्ह्यात मरीन क्षेत्राला भरपूर वाव असून कोल्ड स्टोरेज, वेअर हाऊस यांना शासनाकडून मिळणाऱ्या सबसिडीचा उद्योजकांनी लाभ घ्यावा, असेही त्यांनी आ-वाहन केले. नवी मुंबई विमानतळ, दिघी बंदर, जीएनपीटी बंदर, प्रस्तावित रेवस-रेड्डी महामार्ग यामुळे कोकणात इन्फ्रास्ट्रक्चरचे जाळे निर्माण होणार असून त्याचा फायदा उद्योग क्षेत्राला नक्कीच होणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत 'विकसित भारत' घडवण्याचे उद्दिष्ट ठेवले असून त्या दिशेने आपण वाटचाल करत आहोत, असेही त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी यांनी उद्योजकांबरोबर संवाद साधला. मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पनवेल महानगरपालिका उपायुक्त वैभव विधाते, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळया यांनी मनोगत व्यक्त केले.

# मुरुडमध्ये तात्पुरत्या डागडुजीने यंदाही बाप्पाचा प्रवास खडतर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

श्री गणरायाचे आगमन अवघ्या चार असताना मुरुड तालुक्यातील शहरासह ग्रामीण भागातील साळाव -चोरढे,काकळघर -मांडला, चिकणी -सर्वा रस्त्यावरील खड्ड्यांमुळे यंदाही बाप्पाचा प्रवास खडतर झाल्याने संबंधित बांधकाम खात्याच्या कामाबाबत गणेश भक्तांकडून नाराजीचा सूर दिसून येत आहे.

साळाव-रोहा मार्गावरअनेक दिवसांपासून साळाव,चेहेर,वाघुळवाडी,आमली,येसदे, शिरगाव, वळके,सातिर्डे,चोरढे रस्त्यावर दुरावस्था खड्ड्याच्या त्रासाने ग्रामस्थ, नागरिक हैराण आहेत.मुरुड ते एकदरा दरम्यान रस्त्यावर नुकतीच खड्डे बुजवून मलमपट्टी करण्यात आली होती, चोवीस तास होतात न होतात तोच खड्ड्यांतील खडी रस्त्यावर आल्याने पुन्हा जैसे थे परिस्थिती झाली.तालुक्यातील सर्वे, चिकणी, मांडला -काकळघर भागात खड्ड्यांचे साम्राज्य असल्याने यंदाही बाप्पाचा प्रवास खडतर झाल्याने श्रीगणेश भक्तांकडून नाराजीचा सूर दिसून येत आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वकर्तृत्वाने जीवनाचे पान भरले : बाळासाहेब पाटील



**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्वसामान्यांच्या दुःखाशी जोडलेले राहणे, समाजकारणात पारदर्शकता ठेवणे आणि कोणत्याही परिस्थितीत सत्य बोलण्याची तयारी ठेवणे हे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य असून त्यांनी स्वकर्तृत्वाने जीवनाचे पान भरून ठेवले आहे, असे गौरवोद्गार कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांनी आज येथे काढले.

गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने पनवेल शहरातील मार्केट यार्ड मधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धेचे उदघाटन भाजपचे ज्येष्ठ नेते व पनवेल नगरपरिषेदेचे माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर व कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आज (दि. २३) येथे झाले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर, माजी शहर अध्यक्ष अनिल भगत, जयंत पगडे, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, प्रल्हाद केणी, पंडित शंकरराव वैरागकर, बंडाराज घाडगे, नंदकुमार पाटील, ह. भ. प. निवृत्तीबुवा चौधरी, शंकुनाथबुवा पडघेकर, महादेवबुवा शहाबाजकर, सारेगम फेम जितेंद्र तुपे, इंडियन आयडॉल विजेता सागर म्हात्रे, भाजपचे पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, उत्तर मंडल अध्यक्ष दिनेश खानावकर, पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, जे. टी. पाटील, संतोषबुवा पाटील, अध्यात्मिक समन्वय आघाडी कोकण संयोजक मोहन म्हात्रे, सुचिता वांजळे, आयोजन समितीचे पं. उमेश चौधरी, वसंतबुवा पाटील, पुनमताई ठाकूर, अभिषेक पटवर्धन, गणेश जगताप, नारायणबुवा पाटील, चंद्रकांत मने, जगदिश म्हात्रे, पवन राजे, शैलेश वाजेकर, विनोद तोडेकर, प्रसाद पाटील, सागर राजे, यांच्यासह भजन मंडळी उपस्थित होते.

# उसर येथील वयोवृद्ध महिलेच्या घरावर जेसीबी



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

उसर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीचे काम गेल्या काही महिन्यांपासून सूरू झाले आहे. या जागेच्या बाजूलाच लागून असलेल्या घरांसह गोठा, व पोल्ट्री फार्म तोडण्याचे काम प्रशासनाकडून करण्यात आले. मोठ्या कष्टाने उभारलेल्या घरावर जेसीबी फिरवून काही क्षणात ते मातीमोल केले. पोलिसांच्या बलाचा वापर करीत शुक्रवारी ही कारवाई करण्यात आली.

उसर येथील जानकीबाई शिंदे या वयोवृद्ध महिलेचे घर गेल्या अनेक वर्षांपासून आहे. कष्टाने त्या महिलेने घर उभारले. परंतु, विकासाच्या नावाखाली प्रस्तावित वैद्यकीय महाविद्यालयाला अडथळा ठरणाऱ्या या घरावर शुक्रवारी सायंकाळी जेसीबी फिरविण्यात आला. वयोवृध्द महिलेस भालचंद्र शिंदे यांनी चार सप्टेंबरपर्यंत मुदत मागून ही कारवाई पुढे ढकलण्याची मागणी केली. परंतु घर, गुरांचा गोठा, पोल्ट्री बेकायदेशीर ठरवत सायंकाळी सुरु केली. दुप-ारपासूनच रेवदंडा पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले, मेडीकल कॉलेजचे प्रशासकीय कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलीस अधिकाऱ्यांना विनवणी करण्यात आली. मेडीकल कॉलेजच्या अधिष्ठता यांच्याशी संपर्क साधला. घटनास्थळी दाखल झालेले मेडीकल कॉलेजच्या कर्मचाऱ्यांना विनंती केली. तरीदेखील ना प्रशासन ना पोलीस अधिकारी ऐकण्याच्या मनस्थितीत होते. अखेर वरिष्ठ पोलीस अधिकारी तसेच अलिबाग तहसीलदार कार्यालयातील निवासी नायब तहसीलदार संदीप जाधव यांनी घटनास्थळी जाऊन घर, गोठे तोडण्याची कारवाई सुरु केली. आठ दिवसांची मुदत मागूनही प्रशास-नाने त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. प्रशासनाच्या या मनमानी कारभाराबाबत नाराजीचे सुर उमटत आहेत. याबाबत मेडीकल कॉलेजच्या अधिष्ठाता यांच्याशी संपर्क साधला, असता, होऊ शकला नाही.

उसर येथील घरांसह गोठा, पोल्ट्री बेकायदेशीर दाखवून शुक्रवारी कारवाई करण्यात आली. या कारवाईबाबत न्यायालयात दाद मागितली आहे. चार सप्टेंबरला न्यायालयात सुनावणी होणार होती. म्हणून प्रशासनासह पोलिसांना विनंती करीत कारवाई थांबविण्यात यावी अशी मागणी केली. परंतु, प्रशासन व पोलिसांनी याकडे दुर्लक्ष केले. अखेर आम्ही कष्टाने उभारलेले घर, गोठे जमीन दोस्त झाले. गुरे कुठे ठेवायची असा प्रश्न निर्माण झाला असून, जानकीबाई शिंदे या वयोवृद्ध महिला बेघर झाली आहे.